IJARSCT
ISSN: 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Volume 5, Issue 11, March 2025
Impact Factor: 7.67

# भारतीय उत्पादन क्षेत्रातील हरित पुरवठा साखळी व्यवस्थापनाचा अभ्यास

**डॉ. पराग वसंतराव पिंपळापुरे**
**सहयोगी प्राध्यापक**
**दोशी वकील आर्ट्स कॉलेज अँड़ जी.सी.यु.बी. सायन्स अँड़ कॉमर्स कॉलेज, गोरेगाव-रायगड**

**सारांश**

भारतात विविध उत्पादनांची निर्मिती करणारे उद्योग झपाट्याने वाढत असतानाच उद्योगांचा पर्यावरणावर होणाऱ्या वाईट परिणामांकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. यावर उपाय म्हणून परिस्थितीत हरित पुरवठा साखळी व्यवस्थापन (GSCM) ही संकल्पना उद्योगांसाठी अत्यावश्यक ठरते. प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश हा भारतातील हरित पुरवठा साखळी व्यवस्थापनाच्या उत्क्रांतीबाबत जाणून घेणे, भारतातील हरित पुरवठा साखळ्यांसमोरील महत्त्वाची आव्हाने कोणती आहेत ते विस्तृतपणे जाणून घेणे, भारतीय कंपन्यांनी स्वीकारलेल्या नवकल्पना आणि सर्वोत्तम पद्धतींचे परीक्षण करणे, पुरवठा साखळी कार्यक्षमतेबाबत सरकारी धोरणे समजून घेणे ईत्यादीचा सखोल अभ्यास करून भारतातील पुरवठा साखळीत सुधार करण्यासाठी शिफारसी प्रदान करणे हा आहे. या अभ्यासातून असे दिसून आले की, ज्या उत्पादन कंपन्यांनी GSCM धोरणे प्रभावीपणे स्वीकारली आहेत, त्यांना दीर्घकालीन नफा, ब्रँड मूल्य वाढ, व पर्यावरणीय जबाबदारी यांमध्ये सकारात्मकता दिसून आली. हा अभ्यास पर्यावरणपूरक आणि शाश्वत उत्पादनासाठी GSCM ची आवश्यकता अधोरेखित करतो आणि भारतातील औद्योगिक धोरण ठरविण्यामध्ये याचे स्थान मजबूत करण्यासाठी शिफारसी करतो.

**Key words :** हरित पुरवठा साखळी, पर्यावरणीय शाश्वतता, प्रारंभिक गुंतवणूक, व्यावसायिक धोरणे